शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय अनुदानित/
विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत डॉ. धनराज माने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे जा. क्र. उशिसं/शिष्य-१९-२०/डीबीटी/२०४३ दि. १५ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रानुसार विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणेसाठी दि. २९.०२.२०२० पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तराववरुन पडताळणी करणेसाठी दि. ०८ मार्च, २०२० तसेच विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १५ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे, याबाबतचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 117
दि. 20/02/2020

d:\2019\mangutkar\circular.docx

आ.क्र. 2267


# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११२५३


क्र.उशिसं/शिष्य.१९-२०/डीबीटी/ 2613 दि. १५.०२.२०२०

तात्काळ ईमेलद्वारा 15 FEB 2020

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत...

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
३. शासन निर्णय क्र. मातंस-२०१८/प्र.क्र. १३८/से-१/३९, दि. १२.१०.२०१८
४. संचालनालयाचे दि. ३०.०७.२०१९, दि. ३१.०७.२०१९, दि. ९.०८.२०१९, दि. २०.०८.२०१९, दि. ७.१०.२०१९, दि. १५.१०.२०१९, दि. १.११.२०१९, दि. ४.११.२०१९, दि. ६.११.२०१९, दि. १३.११.२०१९, दि. १६.११.२०१९, दि. २६.११.२०१९, दि. १२.१२.२०१९, दि. १८.१२.२०१९, दि.२३.१२.२०१९ दि. २३.१२.२०१९, दि.१५.०१.२०२०, दि.२७.०१.२०२०, दि.०१.०२.२०२०, दि. ०६.०२.२०२० व दि. ७.०२.२०२० रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांच्या मदतीसाठी डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये वेळोवेळी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर शिष्यवृत्तीसाठी सन २०१९-२० करीता प्राप्त झालेल्या अर्जांचे प्रमाण हे मागील वर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्यापही शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणेसाठी दि. २९.०२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरच्या मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. तरी अंतिम मुदतीची वाट न पाहता, शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शक्य तितक्या लवकर महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज भरणेबाबत त्यांचे महाविद्यालयामार्फत कळविण्यात यावे. महाविद्यालयांनी विशेष कार्यशाळा आयोजीत करुन त्यांचे महाविद्यालयामधील शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणेबाबत सहाय्य करण्यासंबंधी आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. जेणेकरुन एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही.

Received
15-02-2020
3-30 P.M.

तसेच महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. ८ मार्च, २०२० तसेच विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १५ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. महाविद्यालय व विभाग स्तरावरुन अर्जांची पडताळणी करणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज सिस्टीमद्वारे आपोआप रिजेक्ट होतात. त्यामुळे प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यात उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत संबंधित कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील. सदरची बाब आपल्या विभागातील सर्व अकृषि विद्यापीठे

तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर इन्स्टयुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही. महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जाची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. सदरची बाब संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयांमार्फत कळविण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

DBK/RAD/NKK/AAL कृपया त्यानुसार कार्यवाही करावी.
15/2

15/2

Supdt
कृपया सदरचे पत्र संकेतस्थळावर T.2 व सर्व विद्यापीठ अधिविभागाच्या निदर्शनास आणावे.
15/2